MHJN060013092010

## निशाणी क्र.७८ खाली आदेश

प्रतिवादीने सदरचा अर्ज **दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश VI नियम १६** अन्वये वादीने वादपत्रामध्ये पनवानगी न घेता ज्या दुरुस्ती केलेल्या आहेत त्या काढुन टाकण्याबाबत आदेश पारीत करावा या विनंतीन्वये दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादीच्या कथनानुसार वादीने पुढीलप्रमाणे वादपत्रामध्ये नमुद दुरुस्ती या न्यायालयाची परवानगी न घेता केल्या आहेत-

अ. वादी क्र.५ हे मयत असून त्यांना प्रतिवादी क्र.१३ ते १६ म्हणुन वादपत्रामध्ये समाविष्ठ केले आहे.

ब. मयत लक्ष्मण रायभान सोनुने यांच्या वंशावळीमध्ये केलेले बदल

क. वादी क्र.४ याची वादपत्रावर सही नसतांनाही त्यास वादी म्हणुन समाविष्ठ केले आहे.

ड. विनंती कलमामध्ये वादीने केलेला बदल.

सबब, सदरचे बदल हे विना परवानगी केले असल्याने ते काढुन टाकण्याबाबत वादीस आदेशीत करावे अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०३. वादीने असे म्हणणे दाखल केले आहे की, करण्यात आलेली दुरुस्ती ही न्यायालयीन आदेशान्वये केलेली आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादींनी जी प्रथम हरकत नोंदविलेली आहे ती अशी आहे की, वादी क्र.५ च्या वारसांना प्रतिवादी म्हणुन सामील केले आहे. परंतु सदरचा बदल हा निशाणी क्र.४४ कडे पारीत आदेशान्वये वादीने केल्याचे दिसुन येत आहे. सबब, सदर प्रतिवादीच्या कथनामध्ये कोणतेही तथ्य आढळुन येत नाही.

०५. प्रतिवादीने पुढे अशी हरकत नोंदवली आहे की, मयत लक्ष्मण रायभान सोनोने याच्या वंशावळीमध्ये वादीने बदल केलेले आहेत. परंतु मुळ वादपत्र व दुरुस्त वादपत्राचे अवलोकन केले असता वादीने मयत लक्ष्मण सोनवणे यांची वंशावळ केवळ दुरुस्त वादपत्रामध्ये सुस्पष्टरित्या नमुद केलेली आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१२ जीचे

नाव मुळ वादपत्रामध्ये विमलबाई असे नमुद केले होते तिचे नावामध्ये देखील वादीने निशाणी क्र.७३ कडे अर्ज दाखल करुन दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली होती व त्याअनुषंगाने देण्यात आलेल्या परवानगीनुसार प्रतिवादी क्र.१२ च्या नावामध्ये वादीने बदल केलेला आहे. सबब, केवळ मयत लक्ष्मण रायभान सोनोने यांची वंशावळ वादपत्रामध्ये सुस्पष्टरित्या मांडली म्हणुन सदर वादपत्रामध्ये वादीने विना परवानगी बदल केला असे म्हणता येणार नाही.

०६. प्रतिवादीने पुढे अशी हरकत नोंदविली आहे की, वादी क्र.४ ची वादपत्रावर सही नसतांनादेखील त्यास वादी म्हणुन दाव्यात समाविष्ट केलेले आहे. मुळ वादपत्राचे तसेच दुरुस्त वादपत्राचे अवलोकन केले असता वादी क्र.४ यांचा अंगठा वादपत्रावर उमटविण्यात आल्याचे दिसुन येत आहे. तसेच वादीतर्फे निशाणी क्र.२ कडे जे वकील पत्र दाखल करण्यात आले त्यावर देखील वादी क्र.४ चा अंगठा उमटविण्यात आल्याचे दिसुन येत आहे. सबब, सदर कथनामध्ये देखील कोणतेही तथ्य दिसुन येत नाही.

०७. प्रतिवादीने विनंती कलमामध्ये वादीने विना परवानगी बदल केला अशी देखील हरकत नोंदविली आहे. मुळ वादपत्रामध्ये वादीने विनंती कलमामध्ये चतुःसिमा नमुद केलेल्या नाहीत. सदरच्या चतुःसिमा वादीने दुरुस्त वादपत्रामध्ये नमुद केलेल्या आहेत. सदरचा चतुःसिमेबाबतचा मजकुर विनंती कलमामध्ये समाविष्ट करण्याबाबत वादीने न्यायालयाची कोणतीही पुर्व परवानगी घेतल्याचे दिसुन येत नाही. सबब, सदरचा मजकुर हा दुरुस्त वादपत्रामधून काढुन टाकण्यास पात्र आहे.

०८. वादीने केलेल्या सदरच्या विनंती कलमामधील बदलामुळे दाव्याचे कामकाज प्रलंबित राहीले. सबब, प्रस्तुत अर्जाचा खर्च वादीने प्रतिवादीस देणे उचित ठरेल. सबब, दिवाणी प्रक्रिया संहीता आदेश VI नियम १६ प्रमाणे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे-

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.
२. वादीने दुरुस्त वादपत्रामध्ये विनंती कलमामध्ये नमुद केलेल्या चतुःसिमा काढुन टाकाव्यात.

३. वादीने सदरची दुरुस्ती दुरुस्त वादपत्रामध्ये करुन दुरुस्त वादपत्र पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर सादर करावे.

४. प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रु.२००/- वादीने प्रतिवादीस द्यावा.

५. आदेशाची नोंद उभयपक्षकारांनी घ्यावी.

Digitally signed by MAYURESH RAJEEV KALE
Date: 2025.09.30 17:09:48 +0530

भोकरदन. (मयुरेश आर काळे)
दिनांकः ३०.०९.२०२५ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
भोकरदन.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Smt. S. R. Ingle |
| Court | : | CJJD & JMFC, Bhokardan |
| Date | : | 30.09.2025 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 30.09.2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 30.09.2025 |